# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०८/२०१९
## दि.०९/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३३०/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४३,रा.नवी सांगवी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१९ रोजी १६/३० वा. एस.बी.आय. बँकेच्या मुख्य शाखेच्या एटीएम मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया एस.बी.आय. बँकेच्या मुख्य शाखेच्या एटीएम मधुन पैसे काढण्यासाठी गेल्या असताना,त्यांचे पाठीमागे उभ्या असणा-या एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांना मी तुम्हाला मदत करतो असे सांगुन,फिर्यादी यांचे हातातील एटीएम घेवुन मशीन मध्ये टाकुन पीन नंबर टाकण्यास सांगितले,परंतु पैसे न आल्याने,परत ती प्रक्रीया करण्यास सांगितले तरीही पैसे न आल्याने,सदर इसमाने फिर्यादी यांना मशीन मध्ये पैसे नाहीत असे सांगितल्या नंतर,फिर्यादी हया एटीएम कार्ड घेवुन बस स्टॉपवर जात असताना,त्यांना मोबाईलवर १० हजार रूपये दोनवेळा असे २० हजार रूपये काढल्याचे,तसेच ऑनलाईन माध्यमाव्दारे ४० हजार रूपये एका इसमाचे खात्यावर जमा झाल्याचे फिर्यादी यांना एसएमएस आला. तरी सदर अनोळखी इसमाने हातचलाखीने फिर्यादी यांचे एटीएम कार्ड घेवुन,तसेच पिन कोड माहिती करुन घेवुन,त्यांचे खात्यामधुन एकुण ६०,०००/- रुपये काढुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.एम.पाटील ९५९४०००११८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १८३/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४६,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०५/२०१९ रोजी १८/०० ते १८/३० वा. चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांची हार्ली डेव्हिडसन मोटार सायकल विकायची असल्याने,फिर्यादी यांनी ओएलएक्स वर जाहिरात दिली असता,यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांना विकत घेणेबाबत फोन करून,फिर्यादी यांना आगाऊ रक्कम म्हणुन ५० हजार रूपये गुगल पे वर पाठवुन देतो असे सांगितले. त्यासाठी त्याने त्यांना लिंक पाठवुन त्यामध्ये माहिती भरण्यास सांगितली. फिर्यादी यांनी ती लिंक सेट केली असताना,सदर इसमाने नमुद लिंकव्दारे फिर्यादी यांचे खात्यामधुन १,००,०००/- रुपयेची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), आर.आर.तटकरे ८३२९४७९९२० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५४९/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३८,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०८/२०१९ रोजी १३/३० वा. ते १६/३० वा. फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते फ्लॅटला दरवाजास बाहेरून कडी लावुन बंद करून खाली पार्कींग मध्ये मोबाईलवर बोलत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे दरवाजास लावलेली कडी उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने असा १,६३,०००/- रू किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.ए.गायकवाड ९८२३७११७१८ |

## दि.१०/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १८४/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३३,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१९ रोजी २०/०० वा. नरहरी सोसायटीचे समोरील गेटचे पुढे रिलायन्स मॉल जवळ,एरंडवणा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे कामावरून सुटुन पायी जात असताना,नमुद इसमाने दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३३ हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.गोरे ९९७५०७४०६२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**